# प्रेसनोट तारीख ०१/११/२०१८

## येरवडा पोलीसांकडुन अंमली पदार्थ (गांजा) विक्री करणारे महिलेस सापळा रचुन कारवाई

---------------o-----------------

येरवडा पोलीस ठाणेचे हददीत ०१/११/२०१८ रोजी दुपारी येरवडा पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात गस्त करीत असताना तपास पथकातील पो.ना मनोज कुदळे यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, कंजारभाट वस्ती श्रीकृष्ण मंदीरासमोर पंटागणात येरवडा पुणे येथे महिला नामे चमेलीबाई पदेडीयासिंग बांटुंगे वय ६५ वर्षे रा.कंजारभाट वस्ती येरवडा पुणे येणार असुन तिचे कमरेचे पिशवीमध्ये तिने विक्री करण-यासाठी गांज्याच्या पुडया आणल्या असुन मी गांज्या विक्री करणेसाठी येणार आहे. अशी बातमी मिळाल्याने स्टापसह सदर ठिकाणी सापळा रचुन सदर महिला ताब्यातुन २५० ग्रॅम गांजा कि.रु.४२२०/- जप्त करण्यात आला आहे. सदरची कामगिरी पोलीस उप आयुक्त परि-४ श्री प्रसाद अक्कानवरु साो, सहा. पोलीस आयुक्त येरवडा विभाग श्री गावडे सो, वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री दिनकर मोहीते साो, पोलीस निरीक्षक गुन्हे श्री बालवडकर साो यांचे मार्गदर्शना खाली तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक श्री रविंद्र गवारी, सपोफौ बाळासाहेब बहिरट,पो.हवा.हणमंत जाधव, पो.हवा.अजिज बेग, पो.ना.नागेश कुंवर, पो.ना.मनोज कुदळे यांनी केली आहे.

Scanned by CamScanner